भारतीय समाजविज्ञान कोश

Encyclopaedia of Social Sciences
(Marathi)

कोशाची रूपरेषा
विषयांचे नियोजन, वर्गीकरण
लेख-सूची

संपादक
स. मा. गर्गे

समाजविज्ञान मंडळ, पुणे

प्रकाशक
स. मा. गर्गे
'ज्ञानेश' १२०७/४ शिवाजीनगर, पुणे ४

मुद्रक
चिं. स. लाटकर
कल्पना मुद्रणालय,
४६१/४ सदाशिव पेठ, 'शिव-पार्वती',
पुणे ३०

भारतीय समाजविज्ञान कोश योजनेची रूपरेषा

संपादकीय निवेदन

' समाजविज्ञान मंडळा 'च्या वतीने संपादित व प्रकाशित करावयाच्या ' भारतीय समाजविज्ञान कोश ' योजनेची रूपरेषा सोबत सादर केली आहे. त्यावरून अशा कोश-ग्रंथाची आवश्यकता, त्याची वैशिष्टये आणि त्यातील विषयांची व्याप्ती व मर्यादा यासंबंधी कल्पना येऊ शकेल अशी अपेक्षा आहे.

उद्देश : देशातील सर्वसामान्य नागरिकाला राजकीय, आर्थिक आणि सामाजिक घटना, त्यामागील सिद्धान्त, विचारप्रवाह, त्या घटना घडविणाऱ्या प्रमुख व्यक्ती आणि विचारवंत यांच्यासंबंधीचे संदर्भ सुलभ रीतीने शोधता यावेत असा एक महत्त्वाचा उद्देश या कोशयोजनेमागे आहे. लोकशाहीच्या काळात असे विविध विचारप्रवाह व त्यांचे अचूक संदर्भ माहीत असण्याची गरज सहज पटण्यासारखी आहे. राजकीय, आर्थिक आणि सामाजिक तत्त्वे, संघटना, त्यांचे व्यवहार आणि कार्यपद्धती यांचा परिचय नसेल तर, नागरिकाला लोकशाहीचा अर्थ, कार्य आणि कारण समजू शकणार नाही. लोकशाही विचाराचे पोषण आणि राजकीय जागरूकता यांसाठीही समाजविषयक तत्त्वांची व प्रश्नांची चांगली तोंडओळख असणे आवश्यक आहे. ' भारतीय समाजविज्ञान कोश ' योजनेची आखणी करताना हे सारे उद्देश दृष्टीसमोर ठेवले आहेत.

स्वातंत्र्यानंतर भारतीय नागरिकाला अनेक सामाजिक प्रश्न समजून घेण्याची गरज अधिकच वाढली आहे. ज्ञान-विज्ञानाच्या क्षेत्रात क्रांतिकारक घटना घडत आहेत. समाजजीवनाविषयीच्या जाणिवांचे क्षेत्र वाढत चालले आहे. राजकारणाला नवी क्षितिजे मिळाली आहेत. समाजपरिवर्तन झपाट्याने घडू लागले आहे. आर्थिक जडणघडण वेगाने बदलत आहे. अशा वेळी समाजविज्ञानाच्या प्रमुख प्रेरणा, सिद्धान्त, विचार आणि संघटना यांचा सुलभतेने परिचय करून घेणे अगत्याचे झाले आहे. त्यासाठी भारतीय समाजविज्ञान कोशासारख्या संदर्भग्रंथाचे महत्त्व सहजपणे मान्य होऊ शकेल.

याच उद्देशाने प्रेरित होऊन भारतीय समाजविज्ञान कोश संपादन करण्याचे योजिले आहे.

व्याप्ती : या कोशग्रंथात राज्यशास्त्र, अर्थशास्त्र आणि समाजशास्त्र या तीन समाज–विज्ञान शाखांचा समावेश असेल. या तीन विषयांचे तात्त्विक विवेचन तर कोशात

असेलच; पण एकूण कोशाची रचना व स्वरूप प्रामुख्याने भारताच्या संदर्भात व्यक्त व्हावे अशी योजना मनाशी धरलेली आहे. त्यासाठी या कोशात भारतातील परिस्थिती, भारताच्या समस्या आणि भारताच्या विकासाची दिशा यावर प्रामुख्याने भर देण्यात येईल.

आवश्यकता : मराठी भाषेत समाजविज्ञानासारख्या विषयांचा कोश अथवा तत्सम संदर्भग्रंथ उपलब्ध नाही. महाराष्ट्रात शिक्षण–प्रसाराची गती आणि व्याप वाढत आहे. त्याचबरोबर इंग्रजीचा अभ्यास कमी होत चालला आहे. विद्यापीठात मराठी माध्यमाचा उपयोग वाढत आहे. समाजात नवे वर्ग उदयाला येत आहेत. आजवर ज्ञानाचे क्षेत्र उपलब्ध नसलेले समाज शिक्षणाच्या क्षेत्रात प्रवेश करीत आहेत. त्यांना समाजविज्ञानाची तत्त्वे आणि प्रश्न ऐतिहासिक पार्श्वभूमीसह समजण्याची गरज आहे.

मराठी भाषा राज्यभाषा म्हणून मान्यता पावली आहे. स्वाभाविकच शासकीय व्यवहार, शिक्षण, शिक्षणसंस्था आणि इतर सामाजिक व सांस्कृतिक संस्था यांना मराठीचा वापर करावा लागतो. अशा स्थितीत राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, समाजशास्त्र यासारख्या विषयांच्या मराठी संदर्भग्रंथाची गरजही वाढणे अपरिहार्य आहे.

विषयवार कोश : ‘ भारतीय समाजविज्ञान कोश ’ हा विषयवार असा ‘ विशेष कोश ’ असेल. ज्ञानकोश आणि विश्वकोश यांच्यासारख्या सर्वसंग्राहक आणि सर्वविषय-समावेशक महाकोशांची गरज निर्विवाद आहे, पण त्याबरोबरच काही प्रमुख ज्ञानशाखांचे स्वतंत्र विषयवार कोश निर्माण करण्याची गरजही पटण्यासारखी आहे. त्याशिवाय, सर्वविषयसंग्राहक कोशात सर्वच विषयांची विस्तारपूर्वक नोंद करणे शक्य नसते. त्या कोशात ज्ञान-विज्ञानाच्या शाखोपशाखांचा समतोल राखण्यासाठी बऱ्याच उपयुक्त विषयांचाही संकोच करणे अपरिहार्य असते. म्हणून अशा विषयांचे विस्तृत विवेचन विषयवार विशेष कोशातच करणे शक्य असते आणि इष्टही असते.

मराठी भाषेत तत्त्वज्ञान, साहित्य, संस्कृती, शिक्षण इत्यादी विषयांचे विषयवार कोशग्रंथ तयार होत आहेत. अशा वेळी समाजविज्ञानासारख्या विषयांची उपयुक्तता अधिकच मानावी लागेल. राज्यशास्त्र, अर्थशास्त्र आणि समाजशास्त्र ही तिन्ही सामाजिक विज्ञाने नागरिकाच्या जीवनाला अनेक अंगांनी व्यापणारी आहेत. लोकशाही राष्ट्रातील नागरिकांना तर या तीन विषयांचा संदर्भ समजून घेणे आवश्यक आहे. म्हणूनच असेही म्हणता येईल की, समाजविज्ञान कोश विशिष्ट विषयांपुरताच मर्यादित असूनही त्याचे प्रभावक्षेत्र खूपच व्यापक आहे.

उपयुक्तता : या कोशाचा उपयोग राजकीय, आर्थिक व सामाजिक क्षेत्रातील कार्यकर्ते, लोकप्रतिनिधी, प्रशासक, प्राध्यापक, संशोधक, पत्रकार, शिक्षक, शासकीय नोकर, व्यापारी, शिक्षणसंस्था इत्यादींना होऊ शकेल. त्याशिवाय महाविद्यालयाशी संबंध न येणारा व त्यामुळे ग्रंथालयाचा उपयोग करू न शकणारा फार मोठा वर्ग समाजात

आहे. त्याची जिज्ञासा आणि माहिती यासाठीही या कोशाची उपयुक्तता विशेषत्वाने पटू शकेल.

भारताच्या सामाजिक, राजकीय व आर्थिक संदर्भाविषयीच्या नोंदी विस्ताराने देण्याचा या कोशाचा संकल्प, कोशाची उपयुक्तता अधिक वाढवील अशी अपेक्षा आहे.

इतर माहिती : (१) कोश योजना पूर्ण करण्यासाठी 'समाजविज्ञान मंडळ' ही संस्था रजिस्टर करण्यात आली असून त्यासाठी एक विश्वस्त मंडळही नेमलेले आहे. मंडळाच्या संस्थापक-सभासदांची नावे इतरत्र दिली आहेत.

(२) या कोशाची संपूर्ण योजना ६ खंडांत पूर्ण होईल. प्रत्येक खंडाची पृष्ठ-संख्या सुमारे ६०० असेल. आणि त्यात वर्णानुक्रमे विषयांच्या नोंदी दिल्या जातील.

(३) संपूर्ण कोश योजना सहा ते सात वर्षांत पूर्ण व्हावी अशी अपेक्षा आहे. अर्थात ती पूर्ण होणे मुख्यतः लेखन सहकार्य आणि आर्थिक साहाय्य यांचा आकार आणि वेग यावर अवलंबून आहे.

(४) प्रस्तुत पुस्तिकेत फक्त राज्यशास्त्र विषयांतर्गत विषयांचे नियोजन, वर्गीकरण आणि लेखसूची यांचा समावेश केलेला आहे. अर्थशास्त्र आणि समाजशास्त्र या विषयांच्याही अशा पुस्तिका तयार करण्यात येत आहेत. यथावकाश त्या प्रसिद्ध होतील.

विनंती : या कोशयोजनेची एक प्राथमिक रूपरेषा काही दिवसापूर्वी मी तयार करून महाराष्ट्रातील या विषयांचे व्यासंगी लेखक आणि विद्वान प्राध्यापक यांच्याकडे विचारार्थ पाठविली होती. माझ्या विनंतीला मान देऊन त्यांनी या योजनेसंबंधी आपले अभिप्राय कळविले. बहुतेक सर्वांनी योजनेचे स्वागत केले. काही मित्रांनी लेखन साहाय्य करण्याचीही तयारी दर्शविली. त्यांचा नामनिर्देश पुढे केला आहे. त्या प्राथमिक रूपरेषेचे विस्तारित स्वरूप आणि तपशील या पुस्तिकेत नमूद केले आहेत. त्यासंबंधीही आपले विचार आणि सूचना समजू शकल्या तर त्यांचा फार मोठा उपयोग होईल.

कोश निर्दोष व्हावा व उत्तम संदर्भग्रंथ म्हणून त्याची उपयुक्तता वाढावी यासाठी कोशातील विषय, त्यांचा विस्तार, दिशा आणि कक्षा इत्यादीसंबंधी आपले विचार कळावेत ही अपेक्षा.

दिनांक, १५ आक्टोबर १९७४
'ज्ञानेश' १२०५/४ शिवाजीनगर
पुणे ४.

स. मा. गर्गे
संपादक
भारतीय समाजविज्ञान कोश

स्वागत, सूचना, सहकार्य

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे अध्यक्ष व मराठी विश्वकोशाचे प्रमुख संपादक तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी 'भारतीय समाज-विज्ञान कोश योजना' आस्थेवाईकपणे समजून घेऊन ती पूर्ण करण्यासाठी उपयुक्त सूचना केल्या. तसेच, मराठी तत्त्वज्ञान महाकोशाचे संपादक प्रा. दे. द. वाडेकर व अभिनव मराठी ज्ञानकोशाचे संपादक श्री. ग. रं. भिडे यांनी कोशसंपादनकार्यातील विविध अनुभव सांगून कोशाच्या प्राथमिक तयारीसाठी लागणारे जरूर ते साहित्य पुरविले.

प्रसिद्ध विचारवंत व लेखक श्री. ना. ग. गोरे, डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे, गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र संस्थेचे संचालक डॉ. वि. म. दांडेकर, टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस या संस्थेचे संचालक डॉ. एम्. एस्. गोरे यांनी नियोजित कोशाच्या उपक्रमाचे स्वागत करून तो सिद्ध करण्याचे सुचविले.

प्राचार्य डॉ. ना. य. डोळे (उदगीर), प्राचार्य डॉ. मो. स. गोसावी (नाशिक), प्राचार्य ए. ए. पाटील (अर्जुननगर), प्राचार्य म. वि. कौंडिण्य (संगमनेर), प्राचार्य डॉ. मा. प. मंगुडकर (पुणे), डॉ. प्र. चिं. शेजवलकर (पुणे), डॉ. वि. ग. खोब्रेकर (मुंबई), डॉ. विलास संगवे (कोल्हापूर), डॉ. पां. श्री. घारे (नांदेड), श्री. मुकुंदराव किर्लोस्कर (पुणे), प्रा. नरहर कुरुंदकर (नांदेड), प्रा. वि. मा. बाचल (पुणे), प्रा. रा. म. बापट (पुणे), डॉ. गो. स. कामत (पुणे), डॉ. आनंद नाडकर्णी (पुणे), यासारख्या विद्वानांनी कोश योजना यशस्वी होण्याच्या दृष्टीने बहुमोल सूचना करून सहकार्याचे आश्वासन दिले.

✣

भारतीय समाजविज्ञान कोश

भारतीय समाज–विज्ञान कोश योजनेतील 'राज्य-शास्त्र' विषयांतर्गत लेखांचे नियोजन, वर्गीकरण आणि सूची.

※

राज्यशास्त्र : लेख-सूची

१. विवेचनपर प्रदीर्घ लेख

१. राज्यशास्त्र : प्रास्ताविक, भूमिका
२. भारतीय राजनीतीचे समालोचन
३. पाश्चात्त्य राज्यशास्त्राचा विकास
४. समकालीन राजकीय तत्त्वज्ञान
५. विज्ञान आणि राजकीय तत्त्वज्ञान
६. राज्य आणि धर्म
७. राज्य आणि क्रांती
८. राज्य आणि व्यक्ती
९. आंतरराष्ट्रीय संघटना
१०. संसदीय लोकशाही : मूल्यमापन
११. साम्यवादी राज्य : मूल्यमापन
१२. भारत : स्वातंत्र्य लढ्याचा इतिहास
१३. भारत : स्वातंत्र्यानंतरची २५ वर्षे
१४. भारत : राज्यघटना
१५. भारत : स्वातंत्र्योत्तर निवडणुका
१६. भारत : परराष्ट्र धोरण

२. राजकीय सिद्धान्त, संकल्पना

१७. अधिकार
१८. अधिकार, राजकीय
१९. अधिकार, नैसर्गिक
२०. अधिकार, नागरिक
२१. अधिराज्यत्व (Suzeranity)
२२. अनेकसत्तावाद
२३. अराजक
२४. अराज्यवाद
२५. अल्पजनसत्ता
२६. अलिप्ततावाद
२७. आंतरराष्ट्रवाद
२८. आंतरराष्ट्रीय
२९. आंतरराष्ट्रीयत्व
३०. आदर्शवाद, राजकीय
३१. आदर्श राज्यकल्पना
३२. आंदोलन, राजकीय
३३. उत्क्रांती
३४. उत्क्रांतिवाद
३५. उदारमतवाद
३६. उपयुक्ततावाद
३७. उमरावशाही
३८. ऐतिहासिक भौतिकवाद
३९. एकसत्तावाद
४०. कर्तव्य, राजकीय–
४१. कल्याणकारी राज्य
४२. कायद्याचे अधिराज्य
४३. क्रांती
४४. क्रांतिकारक
४५. क्रांतिवाद

३. राज्य आणि राज्यशासन

४. जागतिक राजकीय घटना आणि संघटना

४७८. उपग्रह (राजकीय)
४७९. औद्योगिक क्रांती
४८०. कम्युनिस्ट इंटरनॅशनल
४८१. कम्युनिस्ट जाहीरनामा
४८२. कम्युनिस्ट पक्ष बांधणी
४८३. कम्युनिस्ट पक्ष, अतिपूर्वेकडील देश
४८४. कम्युनिस्ट पक्ष, असेरिका
४८५. कम्युनिस्ट पक्ष, आफ्रिका
४८६. कम्युनिस्ट पक्ष, इंग्लंड
४८७. कम्युनिस्ट पक्ष, चीन
४८८. कम्युनिस्ट पक्ष, दक्षिण अमेरिका
४८९. कम्युनिस्ट पक्ष, पश्चिम युरोप
४९०. कम्युनिस्ट पक्ष, ब्रह्मदेश
४९१. कम्युनिस्ट पक्ष, मध्य युरोप
४९२. कम्युनिस्ट पक्ष, युगोस्लाव्हिया
४९३. कम्युनिस्टपक्ष, रशिया
४९४. कम्युनिस्ट पक्ष, सिलोन
४९५. कॉमिन्टर्न
४९६. कॉमिन्फॉर्म
४९७. कु क्लक्स क्लॅन
४९८. खुदाई खिदमागार
४९९. गुप्तहेर संघटना
५००. गेस्टापो
५०१. छलग्रह (कॉन्सेन्ट्रेशन कँप)
५०२. वंशीय पृथकवासन (रेशियल सेग्रिगेशन)
५०३. ज्यू विरोध
५०४. नकाराधिकार (व्हेटो)
५०५. निःशस्त्रीकरण योजना
५०६. न्यूरेम्बर्ग खटला
५०७. परवेष्टित प्रदेश
५०८. पॅरिस कम्युन
५०९. पॅसिफिक महासागर
५१०. पॉटसडम परिषद
५११. पॉलिट ब्युरो
५१२. पुनर्निवासन
५१३. पोलादी पडदा
५१४. प्रादेश (मँडेट)
५१५. फेबियन सोसायटी
५१६. बगदाद करार
५१७. बर्लिन प्रश्न
५१८. बांगला देश, स्वातंत्र युद्ध—
५१९. बांडुंग परिषद
५२०. बांबू पडदा
५२१. ब्रेन वॉशिंग
५२२. मध्यपूर्व करार संघटना
५२३. महायुद्ध, पहिले
५२४. महायुद्ध, दुसरे
५२५. माऊ माऊ चळवळ
५२६. मानवी हक्काची सनद
५२७. म्युनिच करार
५२८. यादवी युद्ध–अमेरिका
५२९. युद्ध, थंडे (शीतयुद्ध)
५३०. राजकीय पक्ष, अमेरिका
५३१. राजकीय पक्ष, इंग्लंड
५३२. राजकीय पक्ष, जपान
५३३. राजकीय पक्ष, नेपाळ
५३४. राजकीय पक्ष, पाकिस्तान
५३५. राजकीय पक्ष, बांगला देश
५३६. राजकीय पक्ष, ब्रह्मदेश
५३७. राजकीय पक्ष, सिलोन,
५३८. राज्यक्रांती, चीनी
५३९. राज्यक्रांती, फ्रेंच
५४०. राज्य क्रांती, रशियन
५४१. राष्ट्रसंघ
५४२. राष्ट्रकुल (कॉमनवेल्थ)

५. भारतातील राजकीय घटना

६. भारतातील पक्ष आणि संघटना

६६६. महागुजरात जनता परिषद
६६७. महाराष्ट्र एकीकरण समिती
६६८. महाराष्ट्रवादी गोमंतक पक्ष
६६९. मुस्लीम लीग
६७०. रॅडिकल डेमोक्रॅटिक पार्टी
६७१. रामराज्य परिषद
६७२. राष्ट्रीय पक्ष (जहालपक्ष)
६७३. राष्ट्रीय परिषद, काश्मीर—
६७४. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ
६७५. राष्ट्रसेवा दल
६७६. रिपब्लिकन पक्ष
६७७. शिवसेना
६७८. शेतकरी कामकरी पक्ष
६७९. शेडयूल्ड कास्ट फेडरेशन
६८०. संस्थानी प्रजा परिषद
६८१. संयुक्त महाराष्ट्र समिती
६८२. संयुक्त समाजवादी पक्ष
६८३. सार्वजनिक सभा (पुणे)
६८४. स्वतंत्र पक्ष
६८५. स्वराज्य पक्ष
६८६. हरिजन सेवक संघ
६८७. हिन्द सेवक संघ
६८८. हिन्दू महासभा

७. चरित्रपर लेख : भारतीय

६८९. अणे, मा. श्री.
६९०. अन्सारी, मुख्तार अहमद
६९१. अयोध्यानाथ, पं.
६९२. ॲनी बिझांट
६९३. अबुल फजल
६९४. अमात्य, रामचंद्रपंत—
६९५. अय्यर, रामस्वामी—
६९६. अय्यर, सुब्रह्मण्यम—
६९७. अरूंडेल, डॉ.
६९८. अली बंधू
६९९. अशोक, सम्राट
७००. आंबेडकर, भी. रा.
७०१. आझाद, चंद्रशेखर
७०२. उधमसिंग
७०३. कान्हेरे, अनंत लक्ष्मण
७०४. कामा, मादाम
७०५. केळकर, न. चिं.
७०६. कौटिल्य
७०७. कृपलानी, जीवनराम भगवानदास
७०८. खानखोजे, पांडूरंग सदाशिव
७०९. खापर्डे, दादासाहेब
७१०. गांधी, मोहनदास करमचंद
७११. गाडगीळ, नरहर विष्णू
७१२. गोखले, गोपाळ कृष्ण
७१३. घोष, अरविंदबाबू
७१४. घोष, राशबिहारी
७१५. घोष, लालमोहन
७१६. घोष, वीरेंद्रकुमार
७१७. चाणक्य
७१८. चाफेकर बंधू
७१९. चिंतामणी, सी. वाय.
७२०. जयकर, मु. रा.
७२१. जावडेकर, शं. द.
७२२. टंडन, पुरुषोत्तमदास
७२३. टिळक, बाळ गंगाधर
७२४. तय्यबजी, बद्रुद्दीन
७२५. तारासिंग, मास्टर
७२६. दास, चित्तरंजन
७२७. दास, जतींद्रनाथ
७२८. देव, आचार्य नरेंद्र

चरित्रपर लेख : भारतीयेतर

८. राजकीय तत्त्वज्ञानपर-ग्रंथ भारतीय विचार

१२२. अर्थशास्त्र, कौटिल्य
१२३. आज्ञापत्र
१२४. आईन-ई-अकबरी
१२५. कामंदकीय नीतिसार
१२६. त्रिपिटक
१२७. दीघ निकाय
१२८. नीतिवाक्यामृतम्
१२९. बृहस्पतिसूत्र
१३०. मिलिन्द पन्ह
१३१. राजनीतिकल्पतरु
१३२. राजनीतिकामधेनु
१३३. राजनीतिप्रकाश
१३४. राजनीतिप्रमुख
१३५. राजनीतिरत्नाकर
१३६. राज्यव्यवहार कोश
१३७. शांतिपर्व
१३८. शुक्रनीतिसार

राजकीय तत्त्वज्ञानपर ग्रंथ –पाश्चात्य विचार

१३९. प्लेटो, रिपब्लिक
१४०. अरिस्टॉटल, पॉलिटिक्स
१४१. सिसरो, रिपब्लिक
१४२. सेंट ऑगस्टिन, सिटी ऑफ गॉड
१४३. सेंट थॉमस अॅक्विनास, रूल ऑफ प्रिन्सेस
१४४. डांटे, डी मानर्किया
१४५. मॅकियाव्हिली, प्रिन्स
१४६. जँ बोदँ, सिक्स बुक्स कन्सर्निंग द स्टेट
१४७. ह्युगो ग्रोशियस, द लॉ ऑफ वार अॅण्ड पीस
१४८. हॉब्ज, लेव्हीएथन
१४९. जॉन लॉक, टू ट्रिटायझेस ऑन गव्हर्मेंट
१५०. रूसो, सोशल कॉंट्रक्ट
१५१. जेरार्ड विन्स्टले, लॉ ऑफ फ्रीडम
१५२. थॉमस पेन, राईटस ऑफ मॅन
१५३. एडमंड बर्क, रिफ्लेक्शन्स ऑन द रेव्होल्यूशन ऑफ फ्रान्स
१५४. बेंथाम, ए फ्रॅग्मेंट ऑफ गव्हर्मेन्ट
१५५. जॉन स्टुअर्ट मिल, ऑन लिबर्टी
१५६. हेगेल, फिलॉसफी ऑफ राईट
१५७. टी. एच. ग्रीन, द प्रिन्सिपल ऑफ पोलिटिकल ऑब्लिगेशन
१५८. मार्क्स आणि एंगल्स, कम्युनिस्ट मॅनिफेस्टो
१५९. मार्क्स, कॅपिटल
१६०. लेनीन, द स्टेट अँड रेव्होल्युशन
१६१. स्टालिन, नेशन अॅण्ड नॅशनॅलिटी
१६२. लॉर्ड अॅक्टन, हिस्ट्री ऑफ फ्रीडम
१६३. हॉबहाऊस, मेटाफिजिकल थिअरी ऑफ द स्टेट
१६४. सी. डी. बर्न्स, पोलिटिकल आयडिअल्स
१६५. वाल्टर लिपमन, पब्लिक ओपिनिअन
१६६. अल्डस हक्सले, एन्डस अँड मीन्स
१६७. ग्रॅहम वॅलेस, द ग्रेट सोसायटी
१६८. जेम्स ब्राईस, मॉडर्न डेमॉक्रसीस

९. भारतीय भाषांतील राजकीय विचार

१०. संकीर्ण : राजकीय प्रतीके, संज्ञा इत्यादी

Samaj-Vidnyan Mandal is registered under the
Societies Registration Act (1860) and
the Bombay Public Trust Act (1950)

समाजविज्ञान मंडळ (रजिस्टर्ड)

' ज्ञानेश ' १२०५/४ शिवाजीनगर, पुणे ४.

' भारतीय समाजविज्ञान कोश ' योजनेला मूर्त स्वरूप देण्यासाठी ' समाजविज्ञान मंडळ ' स्थापन करण्यात आले असून संस्था नोंदणी कायद्यान्वये ते नोंदविण्यात आले आहे.

मंडळाचे संस्थापक सभासद

प्रा. या. शि. महाजन (अध्यक्ष)
सदस्य, लोकसभा

प्रा. भगवंत देशमुख
मराठी विभाग प्रमुख, शासकीय कला व विज्ञान महाविद्यालय, औरंगाबाद

प्रा. ग. प्र. प्रधान
सदस्य, महाराष्ट्र विधान परिषद

प्रा. शिवाजीराव भोसले
प्राचार्य, मुधोजी महाविद्यालय, फलटण

डॉ. अ. रा. कुलकर्णी
इतिहास विभाग प्रमुख, पुणे विद्यापीठ

डॉ. ना. र. इनामदार
राज्यशास्त्राचे प्राध्यापक, पुणे विद्यापीठ

श्री. गो. य. राणे
प्रकाशक, पुणे

श्री. प्र. रा. देशमुख
ॲडव्होकेट, औरंगाबाद

श्री. स. मा. गर्गे (संचालक)

卐

संपादकीय पुस्तिका : २

समाजशास्त्र व तत्सम विषय

भारतीय समाजविज्ञान कोश

Encyclopaedia of Social Sciences (Marathi)

कोशाची उपयुक्तता

समाजशास्त्र व तत्सम विषयांची

लेख-सूची

संपादक

स. मा. गर्गे

समाजविज्ञान मंडळ

'ज्ञानेश' १२०५/४ शिवाजीनगर, पुणे ४.

टेलिफोन : ५६४१५

Encyclopaedia of Social Sciences, (Marathi)

'Dnyanesh' 1205/4 Shivaji Nagar, Poona 4

Samaj Vidnyan Mandal

Princi. **Y. S. Mahajan**, M. P.
President, Jalgaon

Prof. **B. G. Deshmukh**
Govt. College, Aurangabad.

Prof. **G. P. Pradhan**, M. L. C.
Poona

Princi. **Shivajirao Bhosale**
Mudhoji College, Phaltan

Dr. **N. R. Deshpande**
Professor and Head,
Department of Politics,
Nagpur University

Dr. **A. R. Kulkarni**
Professor and Head,
Department of History
Poona University

Dr. **N. R. Inamdar**
Professor of Politics
Poona University

Dr. **Vilas Sangave**
Professor of Sociology
Shivaji University

Shri. **G. Y. Rane**
Publisher, Poona

Shri. **P R. Deshmukh**
Advocate, Aurangabad

Shri. **S. M. Garge**, Director
Poona

Advisory Committee

Shri. **J. P. Naik**,
member secretary
Indian Concil of Social
Science Research,
New Delhi.

Dr. **M. S. Gore**,
Director Tata Institute
of Social Sciences
Bombay

Shri. **N. G. Gore**, M. P
Social Worker and Author,
Poona

Shri. **J. S. Tilak**, M. P
Editor 'Kesari' Marathi Daily
Poona

Shri. **V. N. Gadgil**, M. P.
Social Worker and Author
Poona

भारतीय समाजविज्ञान कोश

Encyclopaedia of Social Sciences

(Marathi)

कोशयोजनेची वाटचाल

'भारतीय समाजविज्ञान कोश' योजनेची रूपरेषा ऑक्टोबर १९७४ मध्ये प्रसिद्ध केली आणि महाराष्ट्रातील या विषयांचे लेखक, प्राध्यापक, तसेच सार्वजनिक कार्यकर्ते, पत्रकार आणि कोशयोजनेसंबंधी आस्था असणारे यांच्याकडे पाठविली. अनेकांनी योजनेविषयी आपली अनुकूल प्रतिक्रिया व्यक्त केली. योजनेच्या रूपरेषेच्या संदर्भात काही जाणकारांनी बहुमोल सूचना केल्या. काही मित्रांनी लेखन सहकार्य देण्याची तयारी दर्शविली. त्या सर्वांचे मी आभार मानतो.

'इंडियन कौन्सिल ऑफ सोशल सायन्स रिसर्च' नवी दिल्ली (Indian Council of Social Science Research, New Delhi) या समाजविज्ञान संशोधन क्षेत्रातील प्रमुख मध्यवर्ती संस्थेने आमच्या कोश योजनेसाठी Incyclopaedia of The Social Sciences या महत्त्वाच्या संदर्भ ग्रंथाचे सर्व खंड देऊन कोश-कार्याला सक्रिय प्रोत्साहनच दिले आहे.

'इंडियन कौन्सिल ऑफ सोशल सायन्स रिसर्च' या संस्थेचे चिटणीस व प्रसिद्ध शिक्षणशास्त्रज्ञ श्री. जे. पी. नाईक आणि मुंबईच्या 'टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस' संस्थेचे संचालक विख्यात समाजशास्त्रज्ञ डॉ. एम्.एस्. गोरे यांनी आमच्या कोशयोजनेला सहकार्य देण्याचे मान्य केले आहे. त्यांच्या बहुमोल अनुभवाचा आम्हाला चांगला लाभ होईल यात शंका नाही.

'सामाजिक विज्ञान प्रलेखन केन्द्र,' नवी दिल्ली, (Social Science Documentation Centre, New Delhi) या संस्थेचे संचालक, श्री. ना. म. केतकर यांनी कोशयोजनेविषयी आपुलकी तर दाखविलीच आणि त्याबरोबरच ही योजना सिद्ध होण्यासाठी शक्य तेवढे सहकार्य करण्याची सदिच्छाही व्यक्त केली.

प्रसिद्ध विचारवंत आणि लेखक श्री. ना. ग. गोरे, 'केसरी'चे संपादक श्री. जयन्तराव टिळक, राज्यसभेचे सभासद बॅ. विठ्ठलराव गाडगीळ यांनी 'भारतीय समाजविज्ञान कोशयोजने'च्या सल्लागार समितीचे सभासद होण्याची आमची विनंती मान्य केली.

'मराठी तत्त्वज्ञान महाकोशा'चे संपादक प्रा. दे. द. वाडेकर व 'अभिनव मराठी ज्ञानकोशा'चे संपादक श्री. ग. रं. भिडे यांनी कोशाच्या संपादन कार्यातील अनुभवाचा लाभ दिला.

या कोश-ग्रंथांच्या पूर्ततेसाठी महाराष्ट्रातील अभ्यासू लेखक आणि संबंधित विषयांचे प्राध्यापक यांनी लेखन-सहाय्य देण्याचे मान्य केले आहे. प्राचार्य या. शि. महाजन

(जळगाव), प्रा. ग. प्र. प्रधान (पुणे), डॉ. अ. रा. कुलकर्णी (पुणे), डॉ. ना. र. इनामदार (पुणे), प्राचार्य ए. ए. पाटील (अर्जुननगर), प्राचार्य डॉ. ना. य. डोळे (उदगीर), प्राचार्य डॉ. मो. स. गोसावी (नाशिक), डॉ. विलास संगवे (कोल्हापूर), डॉ. पां. श्री. घारे (नांदेड), प्रा. जयसिंगराव पवार (कोल्हापूर), डॉ. गो. स. कामत (पुणे), प्रा. ग. वि. अकोलकर (नाशिक), प्राचार्य डॉ. म. वि. कौंडिण्य (संगमनेर), प्राचार्य डॉ. मा. प. मंगुडकर (पुणे), डॉ. वि. मा. बाचल (पुणे), प्रा. ग. ल. भिडे (सोलापूर), प्रा. ल. ग. बापट (सोलापूर), डॉ. ब. अ. काटीकर (सोलापूर), प्रा. मुकुंद महाजन (पुणे) या व्यासंगी लेखकांनी लेखन-सहकार्य देण्याचे मान्य केले याचा मुद्दाम उल्लेख केला पाहिजे.

वरील सर्व व्यक्ती आणि संस्था यांचा व्यक्तीशः मी आणि मंडळ आभारी आहोत.

कोशाची रूपरेषा दर्शविणाऱ्या पहिल्या पुस्तिकेतच 'राज्यशास्त्र' व तत्सम विषयांच्या नोंदींची सूचीही दिली होती.

प्रस्तुत दुसऱ्या पुस्तिकेत 'समाजशास्त्र' व तत्सम विषयातील लेखांची सूची छापलेली आहे. या सूचीतील उणीवा आपण निदर्शनास आणून द्याव्या अशी अपेक्षा आहे. कोश निर्दोष होण्यासाठी आपल्या सूचनांचा उपयोग होईल.

अशाच स्वरूपाचे ' अर्थशास्त्र ' व तत्सम विषयांच्या लेखसूचीची तिसरी पुस्तिका लौकरच प्रकाशित होईल. आपल्या अवलोकनार्थ ती पुस्तिका यथावकाश पाठविण्याची व्यवस्था करतो.

स. मा. गर्गे
संपादक
भारतीय समाजविज्ञान कोश

भारतीय समाजविज्ञान कोश

आवश्यकता, वैशिष्ट्ये, उपयुक्तता

संक्षिप्त टिपण

(१) भारतीय समाजविज्ञान कोशात राज्यशास्त्र, समाजशास्त्र, अर्थशास्त्र आणि तत्सम समाजविज्ञान-शाखांचा समावेश असेल. या विषयांचे तात्त्विक विवेचन तर कोशात असेलच पण एकूण कोशाची रचना प्रामुख्याने भारताची परिस्थिती, समस्या आणि विकास यांच्या संदर्भात व्हावी अशी योजना आहे. भारताच्या संदर्भातील नोंदी विस्ताराने देण्यात येतील.

(२) मराठी भाषेत समाजविज्ञानासारख्या विषयांचा कोश अथवा तत्सम संदर्भ ग्रंथ उपलब्ध नाही. मराठी भाषा राज्यभाषा म्हणून मान्यता पावली आहे. स्वाभाविकच तिचा वापर शासकीय व्यवहार, महाविद्यालयीन शिक्षण आणि इतर सामाजिक व सांस्कृतिक संस्था यांना करावा लागतो. त्यासाठी प्रमाणित संदर्भग्रंथ म्हणून या कोशाचा उपयोग होऊ शकेल.

(३) महाराष्ट्रात शिक्षण प्रसाराचा वेग वाढलेला आहे. उच्च शिक्षणाचा व्यापही वाढत आहे. अशा स्थितीत राज्यशास्त्र, समाजशास्त्र, अर्थशास्त्र यासारख्या समाजोपयोगी व समाजजीवनाशी निगडीत विषयांच्या संदर्भग्रंथांची गरजही वाढणे अपरिहार्य आहे. लोकशाही राष्ट्रातील नागरिकांना तर या विषयांचा संदर्भ समजून घेणे अत्यंत आवश्यक आहे. ही शास्त्रे समाजजीवनाला अनेक अंगांनी व्यापणारी आहेत.

(४) भारतीय समाजविज्ञान कोश हा विषयवार असा ' विशेष कोश ' असेल. ज्ञानकोश आणि विश्वकोश यांसारख्या सर्वसंग्राहक आणि सर्वविषयसमावेशक महाकोशांची गरज निर्विवाद आहे. पण त्याबरोबरच काही प्रमुख ज्ञानशाखांचे स्वतंत्र ' विषयवार ' कोश निर्माण करण्याची गरजही पटण्यासारखी आहे.

(५) सर्वसंग्राहक कोशात सर्वच विषयांची विस्तारपूर्वक नोंद करणे शक्य नसते. विशेषतः अशा कोशात ज्ञानविज्ञानाच्या अनेक शाखोपशाखांचा समतोल राखण्यासाठी बऱ्याच विषयांचा संकोच करणे अपरिहार्य असते. अशा विषयांचे विस्तृत विवेचन ' विषयवार ' विशेष कोशातच केले जाणे शक्य आणि इष्ट असते.

(६) मराठी भाषेत साहित्य, संस्कृती, शिक्षण, तत्त्वज्ञान इत्यादी विषयांचे विषयवार कोशग्रंथ तयार होत आहेत. समाजविज्ञानासारख्या विषयाची उपयुक्तता तर अधिकच मानावी लागेल.

(७) या कोशाचा उपयोग सामाजिक, आर्थिक व राजकीय क्षेत्रातील कार्यकर्ते, लोकप्रतिनिधी, संशोधक, प्राध्यापक, प्रशासक, पत्रकार, व्यापारी, शिक्षक, सरकारी नोकर, शिक्षणसंस्था इत्यादींना होऊ शकेल. महाविद्यालयाशी संबंध नसणारा व त्यामुळे ग्रंथालयाचा उपयोग करू न शकणारा फार मोठा वर्गही समाजात आहे.

(८) हा कोश ६ खंडांत पूर्ण होईल. प्रत्येक खंडाची पृष्ठसंख्या सुमारे ६०० असेल व त्यात वर्गानुक्रमे विषयांच्या नोंदी दिल्या जातील.

भारतीय समाजविज्ञान कोश

भारतीय समाजविज्ञान कोश योजनेतील '**समाजशास्त्र**' विषयांतर्गत लेखांचे नियोजन, वर्गीकरण आणि सूची.

८. सामाजिक ग्रंथ-लेख पृ. १४

उदा० दि सायन्स ऑफ सोसायटी, प्रिमिटिव्ह मॅरेज, दि स्टडी ऑफ मॅन, कास्ट ॲंड क्लास इन इंडिया इत्यादी.

९. भारताच्या विविध राज्यांतील समाजजीवन पृ. १४

उदा० गुजरात, पंजाब, तामीळनाडू, केरळ, नागाप्रदेश इत्यादी राज्यातील समाजजीवनाची वैशिष्ठ्ये, समाजसुधारणा इत्यादी.

१०. संकीर्ण विषय पृ. १५

उदा० अलुती बलुती, धर्मशाळा, सण, वेषभूषा, इत्यादी.

❈

समाजशास्त्र : लेख-सूची

१. विवेचनपर प्रदीर्घ–लेख

१ समाजशास्त्र : प्रास्ताविक
२ मानवीसमाज : विकासाची वाटचाल
३ समाजरचनेवर विज्ञान व तंत्रविद्येचे परिणाम
४ भारतीय समाजाची वैशिष्ट्ये, वैगुण्ये
५ भारतातील सामाजिक समस्या
६ भारत : आधुनिक समाजसुधारणेचे समालोचन
७ भारत : स्वातंत्र्यानंतरचे सामाजिक परिवर्तन
८ भारतातील स्त्रीजीवन
९ महाराष्ट्र : मराठी समाज
१० महाराष्ट्र : आधुनिक समाजसुधारणा

२. सामाजिक सिद्धान्त आणि संकल्पना

११ अधिकार, सामाजिक
१२ आधुनिकीकरण, सामाजिक
१३ उत्क्रान्ति, सामाजिक
१४ एकदेववाद
१५ औद्योगिक समाजशास्त्र
१६ औद्योगीकरण, सामाजिक परिणाम
१७ क्रांती, सामाजिक
१८ धर्मादाय
१९ नवमतवाद
२० नागर समाजाचे समाजशास्त्र
२१ नागरीकरण
२२ नीतिमत्ता, सामाजिक
२३ प्रज्ञावाद
२४ पृथक्वास
२५ बहूदेववाद
२६ मनुष्यजाती विज्ञान
२७ मानवगुणारोपवाद
२८ मानवजातिशास्त्र
२९ मानवशास्त्र
३० मानवशास्त्र, उपयोग
३१ मानवशास्त्र, भाषिक
३२ मानवशास्त्र, शारीरिक
३३ मानवशास्त्र, सामाजिक
३४ मानवशास्त्र, सांस्कृतिक
३५ लोक
३६ लोकमानस
३७ लोकनीती
३८ लोकाचार
३९ लोकस्थितिशास्त्र
४० वंशद्वेषाचे समाजशास्त्र

३. सामाजिक इतिहास

४. सामाजिक सबंध

५. सामाजिक समस्या

६. सामाजिक संस्था

७. चरित्रपर लेख

८. सामाजिक ग्रंथ-लेख

९. भारताच्या विविध राज्यातील समाजजीवन

१०. संकीर्ण विषय

समाजविज्ञान मंडळ

'ज्ञानेश' १२०५/४ शिवाजीनगर, पुणे ४.

भारतीय समाजविज्ञान कोश

प्रकाशक
स. मा. गर्गे
'ज्ञानेश' १२०५/४ शिवाजीनगर,
पुणे ४

मुद्रक
चिं. स. लाटकर
कल्पना मुद्रणालय,
'शिव-पार्वती'
४६१/४ सदाशिव पेठ,
पुणे ३०

संपादकीय पुस्तिका : ३
अर्थशास्त्र व तत्सम विषय

भारतीय समाजविज्ञान कोश
Encyclopaedia of Social Sciences
(Marathi)

कोशाचे वैशिष्ट्य
अर्थशास्त्र व तत्सम विषयांची
लेख-सूची

संपादक
स. मा. गर्गे

समाजविज्ञान मंडळ
'ज्ञानेश' १२०५/४ शिवाजीनगर, पुणे ४.
टेलिफोन : ५६४१५

Encylopaedia of Social Sciences, (Marathi)

'Dnyanesh' 1205/4 Shivaji Nagar, Poona 4

भारतीय समाजविज्ञान कोश
Encyclopaedia of Social Sciences
(Marathi)

भारतीय समाजविज्ञान कोश

काही प्रमुख वैशिष्ट्ये

भारतीय समाजविज्ञान कोश योजनेची रूपरेषा दर्शविणारी ही तिसरी संपादकीय पुस्तिका. प्रस्तुत पुस्तिकेत 'अर्थशास्त्र' व तत्सम विषयांची लेखसूची दिलेली आहे.

यापूर्वी प्रसिद्ध केलेल्या पहिल्या दोन पुस्तिकांतून अनुक्रमे 'राज्यशास्त्र' व 'समाजशास्त्र' या विषयांतील लेख आणि उपलेख यांच्या नोंदींची विस्तृत सूची दिलेली आहे. त्या दोन्ही पुस्तिका महाराष्ट्रातील लेखक, प्राध्यापक आणि संबंधित विषयांचे अभ्यासक यांच्याकडे पाठविल्या होत्या. हेतू असा की कोशातील विषयांसंबंधी त्यांची प्रतिक्रिया समजून घ्यावी व त्यांच्या सूचनांचाही विचार करता यावा. काही लेखकांनी कोशयोजनेतील तपशिलाबाबत महत्त्वाच्या सूचना केल्या. काही लेखकांनी नवे विषय सुचविले. कोशयोजना अधिक निर्दोष करण्यासाठी अशा सर्व सूचनांचा आम्हाला पुष्कळ उपयोग होईल हे मी आभारपूर्वक येथे नमूद करतो.

मराठी संदर्भ-ग्रंथांची गरज : या कोशयोजनेचा उद्देश, व्याप्ती आणि उपयोग यासंबंधी पहिल्या पुस्तिकेत विस्तारपूर्वक माहिती दिलेली आहे. तिचा पुन्हा येथे तपशिलाने उल्लेख करण्याची गरज नाही. सारांशाने एवढेच म्हणता येईल की, सामाजिक विज्ञानांच्या विविध अंगोपांगांचा संदर्भ दर्शविणाऱ्या अशा विषयवार कोशांची गरज आज अनेक दृष्टींनी आणि अनेक क्षेत्रांत वाढली आहे. शिक्षण प्रसाराची गती आणि व्याप झपाट्याने वाढत आहे. समाजाच्या सर्व थरात आणि वर्गात त्याचा प्रसार होत आहे. शासकीय व्यवहार आणि शिक्षणाचे माध्यम या दोन्ही क्षेत्रांत मराठी भाषेला मान्यता मिळाली आहे. अध्ययन आणि अध्यापनात वाढत्या प्रमाणात मराठीचा उपयोग केला जात आहे. इंग्रजी भाषेचे महत्त्व आणि गरज मान्य करूनही असे म्हणता येईल की, मातृभाषेतून वाढत जाणाऱ्या शिक्षण प्रसाराच्या प्रक्रियेत यापुढे इंग्रजीचा अभ्यास आणि वापर कमी होत जाणे अपरिहार्य आहे. याच प्रक्रियेचा आणखी एक परिणाम म्हणून इंग्रजी माध्यमातून शिक्षण संपादन केलेल्या अध्यापकांची संख्याही बऱ्याच वेगाने कमी होत जाणार हे उघड आहे. पुढच्या पाच दहा वर्षांच्या कालावधीत समाज विषयक शास्त्रांचे अध्ययन आणि अध्यापन करणाऱ्यांना मराठी भाषेतील ग्रंथसंपत्ती आणि निरनिराळ्या विषयांचे मराठी संदर्भ-ग्रंथ यांवरच प्रामुख्याने अवलंबून रहावे लागेल. इंग्रजीचा उपयोग फार थोड्या आणि मर्यादित वर्गालाच

करता येणे शक्य होईल. अशा स्थितीत शिक्षणाचा दर्जा टिकविण्यासाठी त्या क्षेत्रात, (१) दर्जेदार क्रमिक पुस्तके, (२) मान्यवर वैचारिक व शास्त्रीय साहित्य, (३) प्रमुख ज्ञानशाखांचे विषयवार संदर्भ-ग्रंथ, अशा त्रिविध स्वरूपाची ग्रंथनिर्मिती मराठी भाषेतून करावी लागेल. एवढेच नव्हे तर, ही सर्व ज्ञानसाधने अधिक वेगाने आणि अधिक चांगल्या प्रतीची उपलब्ध करून द्यावी लागतील.

समाजविज्ञान मंडळाने प्रस्तुत कोशयोजना हाती घेताना वर उल्लेखिलेली परिस्थिती विचारात घेतली आणि त्यातील सामाजिक विज्ञानांच्या क्षेत्रापुरता '**भारतीय समाजविज्ञान कोश**' तयार करण्याचे ठरविले.

या कोशाची जी रूपरेषा तिन्ही संपादकीय पुस्तिकांत दिलेली आहे, तिला अनुसरून तयार होणारा हा कोश समाजविषयक शास्त्रातील संदर्भांची आजची गरज भागवू शकेल अशी आमची नम्र अपेक्षा आहे. अर्थात ही अपेक्षा पूर्ण होण्यासाठी अनेक लेखकांचे सहकार्य आणि अनुदान देणाऱ्या शासकीय व इतर संस्थांचे अर्थसहाय्य मिळणे आवश्यक आहे. तसे सहकार्य देण्याचे अनेक लेखकांनी व सहाय्यक संस्थांनी मान्य केले आहे, ही या बाबतीत आनंदाची व उत्साहवर्धक घटना मानावी लागेल.

लेख आणि उपलेख : या कोशात समाविष्ट होणाऱ्या लहान मोठ्या लेखांची व उपलेखांची संख्या सुमारे दोन हजारावर जाईल. त्यांची विषयवार विभागणी खाली दिली आहे.

राज्यशास्त्र व तत्सम विषय — १००८
समाजशास्त्र व तत्सम विषय — ४७४
अर्थशास्त्र व तत्सम विषय — ६३५

लेखांची आणि उपलेखांची केवळ मोठी संख्या हे या कोशाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणून सांगता येणार नाही, तर भारतविषयीचे सर्वांगीण संदर्भ विस्तार पूर्वक उपलब्ध करून देणे हे या कोशाचे एक उल्लेखनीय वैशिष्ट्य सांगता येईल. इंग्रजी भाषेतील अशा संदर्भ-ग्रंथात भारतासंबंधीच्या माहितीची उणीव जाणवते. ही वस्तुस्थिती मान्यच करावी लागेल. या बाबतीत थोडे विस्ताराने येथे विवेचन करणे उचित ठरेल असे वाटते.

इंग्रजी संदर्भ-साहित्य : समाजविज्ञान विषयक संदर्भ-साहित्य इंग्रजी भाषेत विपुल प्रमाणात उपलब्ध आहे. त्यात सातत्याने नवी भरही पडत असते. त्यांची विविधता आणि वैशिष्ट्ये अनेक प्रकारची दिसून येतात. जागतिक क्षेत्रातील सामाजिक विज्ञानांचे अनेक संदर्भ अचूकपणे टिपण्याचा इंग्रजी संदर्भ ग्रंथकर्त्यांचा कसोशीने प्रयत्न चालू असतो. त्यामुळे इंग्रजी समाजविज्ञान कोश आणि तत्सम इतर संदर्भ-साहित्य अत्यंत आशयसंपन्न असते. आणि म्हणूनच ते अधिक उपयुक्तही ठरते.

भारताचा संदर्भ : इंग्रजी संदर्भ-ग्रंथांची ही सर्व वैशिष्टये मान्य करूनही भारतीय ज्ञानसाधकाच्या दृष्टीने ते ग्रंथ काही बाबतीत अपुरे ठरतात हे नाकारता येणार नाही. या ग्रंथांतील विवेचनाचा मुख्य केंद्रबिंदू युरोप–अमेरिका असल्यामुळे इतर देशातील अभ्यासकांना आवश्यक वाटणाऱ्या माहितीचा त्यात संकोच झालेला आढळतो. इंग्रजी संदर्भग्रंथ निर्मात्यांच्या दृष्टीने कदाचित ही गोष्ट आवश्यक असेलही; पण भारतासारख्या विशाल, बहुभाषी आणि स्वतंत्र देशांच्या अभ्यासकांना विविध ज्ञानशाखांतील संदर्भ शोधण्याच्या बाबतीत अशा इंग्रजी ग्रंथांचा अपुरेपणा जाणवल्याशिवाय रहात नाही हे मात्र निश्चित. अशा स्थितीत भारतीय नागरिकांना अधिक उपयोगी पडतील असे देशी भाषेत विषयवार कोश निर्माण करणे हाच त्यावर योग्य उपाय ठरतो. हा हेतू दृष्टीपुढे ठेवूनच '**भारतीय समाजविज्ञान कोश**' योजनेत प्रामुख्याने भारतातील परिस्थिती, भारताच्या समस्या आणि भारताच्या विकासाच्या दिशा यासंबंधीचे संदर्भ अधिक संख्येने, अधिक विस्तारपूर्वक आणि अधिक काटेकोर देण्याचा आमचा संकल्प आहे.

अर्थात हा कोश केवळ भारतविषयक संदर्भ माहितीपुरताच मर्यादित रहाणार नाही हेही येथे स्पष्ट केले पाहिजे. त्यात जागतिक पातळीवरील विषयांचाही यथायोग्य आणि यथाप्रमाण समावेश करण्यात येणार आहे. किंबहुना अशा सर्वदेशीय संदर्भपर लेखांशिवाय या कोशाला पूर्णता येणार नाही याची जाणीव ठेवूनच कोशाची रूपरेषा आखलेली आहे.

पुढचा कार्यक्रम : कोशविषयक माहिती आणि लेखसूची समाविष्ट असणाऱ्या तिन्ही संपादकीय पुस्तिकांचा एकत्रित विचार केला म्हणजे भारतीय समाजविज्ञान कोशाचे सर्वसाधारण स्वरूप स्पष्ट होते. पण प्रस्तुत कोशयोजनेचा हा केवळ पहिला टप्पा आहे. या पुढचा दुसरा टप्पा म्हणजे प्रत्येक लेखाची व्याप्ती निश्चित करून संबंधित विषयाच्या तज्ज्ञ व अधिकारी लेखकांकडे त्याचे लेखन सोपविणे. त्यानंतर, लेखकांकडून लिहून आलेल्या लेखांवर संपादकीय संस्करण करून मुद्रणप्रत तयार करणे हा संपादन कार्यातील तिसरा टप्पा आहे. येत्या मार्चपासून दुसऱ्या व तिसऱ्या टप्प्यावरील कामे हाती घेतली जावीत अशी अपेक्षा आहे. प्रथम खंड १ व २ यात समाविष्ट करावयाच्या लेखांचे वर्णानुक्रमे लेखन–संपादन केले जावे अशी योजना आहे. एकूण ६ खंडांत हे सर्व काम पूर्ण होईल. प्रत्येक खंडाची पृष्ठसंख्या सुमारे ६०० असेल.

इतर भाषिकांचे सहकार्य : या कोशात समाविष्ट होणाऱ्या लेखांचे लेखन मुख्यतः मराठी लेखकांकडून केले जाईल हे स्पष्ट आहे तरीपण, काही विषयांच्या बाबतीत इतर भाषिकांकडूनही लेख मिळविण्याचा प्रयत्न केला जाईल. विशेषतः इंग्रजी आणि हिंदी भाषेतून काही लेख मिळावेत अशी आमची योजना आहे. त्यासाठी अर्थातच निरनिराळ्या राज्यातील तज्ज्ञ लेखकांचे सहकार्य मिळवून त्यांच्या ज्ञानाचा व

अनुभवाचा लाभ मिळावा ही इच्छा. त्यांच्याकडून आलेल्या लेखांचे नंतर मराठी भाषांतर करून ते कोशात समाविष्ठ केले जातील.

आभार : कोश योजनेला आरंभापासूनच अनेक प्रमुख व्यक्तींचा सल्ला आणि सहकार्य लाभत गेले याचा येथे मुद्दाम उल्लेख केला पाहिजे.

इंडियन कौन्सिल ऑफ सोशल सायन्स रिसर्च संस्थेचे सभासद- चिटणीस श्री. जे. पी. नाईक, टाटा इन्स्टिटयूट ऑफ सोशल सायन्सेस या संस्थेचे संचालक डॉ. एम. एस. गोरे, प्रसिद्ध विचारवंत आणि लेखक श्री. ना. ग. गोरे, केसरीचे संपादक श्री. जयंतराव टिळक, संरक्षण उत्पादन मंत्री वॅ. विठ्ठलराव गाडगीळ यांच्यासारख्या ज्येष्ठ व्यक्तींनी भारतीय समाजविज्ञान कोशयोजनेच्या सल्लागार समितीचे सभासद होण्याची आमची विनंती मान्य केली.

तसेच, मंडळाचे सभासद होण्यास नागपूर विद्यापीठातील राज्यशास्त्र विभागाचे प्रमुख आणि प्राध्यापक डॉ. एन. आर. देशपांडे, मराठवाडा विद्यापीठातील अर्थशास्त्र विभागाचे प्रमुख आणि प्राध्यापक व्ही. व्ही. बोरकर, शिवाजी विद्यापीठातील समाजशास्त्र विभागाचे प्रमुख आणि प्राध्यापक डॉ. विलास संगवे यांनी संमती दिली.

त्याशिवाय, मराठी तत्त्वज्ञान महाकोशाचे संपादक प्रा. दे. द. वाडेकर, अभिनव मराठी कोशाचे संपादक श्री. ग. रं. भिडे, सोशल सायन्स डाक्युमेंटेशन सेंटरचे संचालक श्री. ना. म. केतकर या सर्वांनी आपल्या अनुभवाचा लाभ दिला.

संदर्भ-ग्रंथांचे सहाय्य

भारतीय समाजविज्ञान कोशाच्या पूर्ततेसाठी Indian Council of Social Science Research; New Delhi; या मान्यवर संस्थेने आम्हाला खालील संदर्भ ग्रंथांचे सर्व खंड दिलेले आहेत. समाजविज्ञान संशोधन क्षेत्रातील या मध्यवर्ती संस्थेने ग्रंथसहाय्य करून आमच्या कोशकार्याला सक्रिय प्रोत्साहनच दिले आहे.

(1) Encyclopaedia of the Social Sciences :
Editor E. R. A. Seligman. 15 Volumes.

(2) International Encyclopaedia of the Social Sciences.
Editor – David L. Sills. 17 Volumes.

या सर्वांचा व्यक्तिशः मी व मंडळ आभारी आहोत.

स. मा. गर्गे

लेखकांचे सहाय्य

कोशग्रंथासाठी लेखन सहाय्य करण्याचे खालील विद्वान व
व्यासंगी लेखकांनी मान्य केले आहे त्यांचे मी
आभार मानतो.—संपादक

प्राचार्य या. शि. महाजन, अर्थशास्त्र, (जळगाव) प्रा. ग. प्र. प्रधान, समाजकारण, (पुणे) डॉ. अ. रा. कुलकर्णी, इतिहास, (पुणे) प्रा. भगवंत देशमुख, साहित्य व समाज, (औरंगाबाद) प्राचार्य शिवाजीराव भोसले, सामाजिक तत्त्वज्ञान, (फलटण) डॉ. एन. आर. देशपांडे, राज्यशास्त्र, (नागपूर) डॉ. एन. आर. इनामदार, राज्यशास्त्र, (पुणे) डॉ. विलास संगवे, समाजशास्त्र, (कोल्हापूर) डॉ. व्ही. व्ही. बोरकर अर्थशास्त्र, (औरंगाबाद) डॉ. मो. स. गोसावी, वाणिज्यशास्त्र, (नाशिक) डॉ. ना. य. डोळे, राज्यशास्त्र, (उदगीर) प्राचार्य ए. ए. पाटील, राज्यशास्त्र, (कोल्हापूर) डॉ. पां. श्री. घारे, राज्यशास्त्र, (नांदेड) डॉ. गो. स. कामत, अर्थशास्त्र, (पुणे) डॉ. म. वि. कौंडिण्य, अर्थशास्त्र, (संगमनेर) डॉ. वि. मा. बाचल, राज्यशास्त्र, (पुणे) प्रा. ग. वि. अकोलकर, शिक्षण व समाज, (नाशिक) डॉ. मा. प. मंगुडकर, राज्यशास्त्र, (पुणे) डॉ. ब. अ. काटीकर, राज्यशास्त्र, (पुणे) प्रा. जयसिंगराव पवार, इतिहास, (कोल्हापूर) प्रा. ग. ल. भिडे, इतिहास, (सोलापूर) डॉ. गोविंद गारे, समाजशास्त्र, (पुणे) डॉ. मुल्ला अर्थशास्त्र, (पुणे) प्रा. ल. ग. बापट, इतिहास, (सोलापूर) डॉ. प्र. पां. पाठक, साहित्य व समाज, (सोलापूर) प्रा. मो. रं. बर्दापूरकर, समाजशास्त्र, (जालना)

भारतीय समाजविज्ञान कोश

भारतीय समाजविज्ञान कोशयोजनेतील ' अर्थशास्त्र ' विषयांतर्गत लेखांचे नियोजन, वर्गीकरण, सूची इ.

अर्थशास्त्र : लेख-सूची

१०९. पुरवठ्याचा सिद्धान्त
११०. पुरवठ्याचा ऱ्हास
१११. पुरवठ्याचा लवचिकपणा
११२. पुरवठ्याचा विस्तार
११३. प्रमाणशीर फलाचा सिद्धान्त
११४. पैशाचा भ्रमणवेग
११५. भागीदारी
११६. भाडेपट्टा
११७. मांडवलशाही स्पर्धेचा सिद्धान्त
११८. मजुरी
११९. मध्यमवर्ग
१२०. मनुष्यबळ
१२१. मक्तेदारी, आर्थिक
१२२. मागणी
१२३. मागणी आणि पुरवठा
१२४. मागणी, अंतर्गत
१२५. मागणी, आंतरराष्ट्रीय
१२६. मागणीचा ताठरपणा
१२७. मागणीचा ऱ्हास
१२८. मागणीचा लवचिकपणा
१२९. मागणीचा विस्तार
१३०. मागणीचा संकोच
१३१. मागणीचा सिद्धान्त
१३२. मागणीपत्रक
१३३. मागणीरेषा
१३४. मालकी, खाजगी
१३५. मालकी, सामुदायिक
१३६. मालकीहक्क
१३७. मालमत्ता
१३८. मालमत्ता, बेवारशी
१३९. मूल्य
१४०. मूल्यघट
१४१. मूल्य, पैशाचे
१४२. मूल्यसिद्धान्त
१४३. राज्यवित्तीय धोरण
१४४. राष्ट्रीय वित्त
१४५. राष्ट्रीय विस्तार सेवा
१४६. राष्ट्रीयीकरण
१४७. रोकड
१४८. रोकड सुलभता
१४९. रोजगार
१५०. रोजगार कार्यालय
१५१. रोजंदारी
१५२. वस्तू
१५३. व्ययरेषा
१५४. व्यवस्थापन
१५५. वाणिज्यवाद
१५६. वाणिज्यशास्त्र
१५७. विनिमय
१५८. विनिमय माध्यम
१५९. विभाजन.
१६०. विषमता, आर्थिक
१६१. वेतन
१६२. वेतन, औद्योगिक
१६३. वेतन, शेतीविषयक
१६४. सर्वेक्षण, प्रतिदर्शी
१६५. संख्याशास्त्र
१६६. संख्याशास्त्रीय विश्लेषण
१६७. संतुलन सिद्धान्त
१६८. संपत्तीचे विभाजन
१६९. सार्वजनिक निधी
१७०. साम्राज्यशाही, आर्थिक
१७१. सिद्धान्तरोपण
१७२. सुवर्णपरिमाण
१७३. स्पर्धा, आर्थिक
१७४. स्पर्धा, अपूर्ण

१७५. स्पर्धा, पूर्ण
१७६. स्पर्धा, अशुद्ध
१७७. स्पर्धा, शुद्ध
१७८. श्रम
१७९. श्रमदान
१८०. श्रम मूल्याचा सिद्धान्त
१८१. श्रम विभागणी

३. आर्थिक घटक

१८२. अन्नधान्य : जग
१८३. अन्नधान्य : भारत
१८४. अन्नधान्य : महाराष्ट्र
१८५. उत्पन्न
१८६. उत्पन्न, पूर्वार्जित
१८७. उत्पन्न, राष्ट्रीय
१८८. उत्पन्न, स्वार्जित
१८९. उत्पन्न, वास्तविक
१९०. उत्पादन
१९१. उत्पादन, राष्ट्रीय
१९२. उत्पादन घटक
१९३. उत्पादन खर्च
१९४. उत्पादन खर्च सरासरी
१९५. उत्पादन खर्च सीमागत
१९६. उत्पादन घटक
१९७. उत्पादन पद्धती : समाजवादी
१९८. उत्पादन पद्धती : भांडवलदारी
१९९. उत्पादन पद्धती : सहकारी
२००. उत्पादन, शेती (कृषी)
२०१. उत्पादन साधने, पारंपरिक
२०२. उत्पादन साधने, यांत्रिक
२०३. उत्पादन साधने, स्वयंचलित
२०४. उपकर
२०५. उपकर, शिक्षण
२०६. उपकर, पाणीपुरवठा
२०७. औद्योगिक उत्पादन : जग
२०८. औद्योगिक उत्पादन : भारत
२०९. औद्योगीक उत्पादन : महाराष्ट्र
२१०. कर, अप्रत्यक्ष
२११. कर आकारणी
२१२. कर आकारणी : प्रगतीशील
२१३. कर आकारणी : प्रमाणशील
२१४. कर, आकस्मित लाभावरील
२१५. कर, आयात
२१६. कर, उत्पादन
२१७. कर, निर्यात
२१८. कर आय. (प्राप्ती)
२१९. कर, प्रत्यक्ष
२२०. कर, भांडवली
२२१. कर, मालमत्ता (संपत्ती)
२२२. कर, व्यवसाय
२२३. कर, वारसा
२२४. कर, विक्री
२२५. कर, देणगी
२२६. कर, शेती उत्पन्नावरील
२२७. कर, स्थानिक
२२८. कर
२२९. करपद्धती
२३०. करपद्धती, प्राचीन
२३१. करपद्धती, मध्ययुगीन काळातील
२३२. करपद्धती, मराठेशाही
२३३. करपद्धती व न्याय
२३४. करभार
२३५. करभार पात्रता
२३६. करभाराची तत्त्वे

२३७. कर्ज, अनुत्पादक
२३८. कर्ज, उत्पादक
२३९. कर्ज, कायमचे
२४०. कर्ज, प्रवाही
२४१. कर्जरेखा
२४२. कर्ज, सार्वजनिक (सरकारी)
२४३. कर्ज, वर्षासन पद्धतीचे
२४४. कुळ
२४५. कुळकायदा
२४६. खर्च
२४७. खंड
२४८. खंडणी
२४९. गहाण
२५०. जकात
२५१. जमीन
२५२. जमीन मर्यादा
२५३. जमीन, लागवडीखालील–जग
२५४. जमीन, लागवडीखालील–भारत
२५५. जमीन, लागवडीखालील–महाराष्ट्र
२५६. जमीन वाटप
२५७. जमीन महसूल
२५८. जमीनदार
२५९. जमीनदारी
२६०. जमीनधारा
२६१. जमीनधारा, प्राचीन
२६२. जमीनधारा, मध्ययुगीन काळातील
२६३. जमीनधारा, मराठेशाही
२६४. जमीनसुधारणेचे कायदे
२६५. नुकसान भरपाई, कामगार
२६६. पाणीपुरवठा, शेती
२६७. पाणीपुरवठा, शेती–भारत
२६८. पाणीपुरवठा, शेती–महाराष्ट्र
२६९. पाणीपुरवठा, लोकवस्ती
२७०. प्राप्तीकर, पुरोगामी
२७१. प्रोत्साहक लाभांश
२७२. महसूल
२७३. महसूल, सार्वजनिक
२७४. लाभांश
३७५. वारंगुळा पद्धत
२७६. वित्त–आयोग
२७७. वित्त विधेयक
२७८. वित्त व्यवस्था
२७९. शेतकरी आंदोलन
२८०. शेतकरी : भारत
२८१. शेतकरी : महाराष्ट्र
२८२. शेतमजूर
२८३. शेतमजूर बाजार
२८४. शेती उत्पादन : महाराष्ट्र
२८५. शेती उत्पादन : भारत
२८६. शेती उत्पादन : जग
२८७. शेतीविषयक अवजारे
२८८. शेती विषयक कायदे, भारत
२८९. शेतीविषयक कायदे, महाराष्ट्र
२९०. शेती
२९१. संपत्ती, राष्ट्रीय

४. आर्थिक व्यवहार

२९२. अर्थव्यवस्था, अनिर्बंध
२९३. अर्थव्यवस्था, कृषीप्रधान
२९४. अर्थव्यवस्था, औद्योगिक क्रांतिपूर्व
२९५. अर्थव्यवस्था, नियंत्रित
२९६. अर्थव्यवस्था, प्राथमिक अवस्था
२९७. अर्थव्यवस्था, भांडवलदारी
२९८. अर्थव्यवस्था, साम्यवादी

३६४. भांडवली वस्तू
३६५. मजुरी
३६६. व्याज
३६७. व्याजाचा दर
३६८. लवाद
३६९. व्यवस्थापन
३७०. व्यापार
३७१. व्यापार, आयात
३७२. व्यापार, खुला
३७३. व्यापार, आंतरराज्यीय (भारत)
३७४. व्यापार, आंतरराष्ट्रीय
३७५. व्यापार, निर्यात
३७६. व्यापारसंतुलन
३७७. व्यापारवाद
३७८. व्यापार, जग
३७९. व्यापार, भारत (प्राचीन काळ)
३८०. व्यापार, भारत (इतिहास काळ)
३८१. व्यापार, भारत (मध्ययुगीन)
३८२. व्यापार, भारत (इंग्रजी राजवट)
३८३. व्यापार, भारत (स्वातंत्र्योत्तर काळ.)
३८४. व्यापार, महाराष्ट्र (मराठेशाही)
३८५. व्यापारी चक्र
३८६. व्यापारी मार्ग, भारत (मध्ययुगीन)
३८७. व्यापारी मार्ग, जग (प्राचीन)
३८८. व्यापारी मार्ग, जग (मध्ययुगीन)
३८९. व्यापारी संघ
३९०. व्यवसाय
३९१. व्यावसायिक
३९२. व्यावसायिक शिस्त
३९३. विमा
३९४. विमा, आयुर्विमा
३९५. विमा, सर्वसाधारण
३९६. सावकार
३९७. सावकारी नियंत्रण
३९८. सावकारी प्रकार
३९९. सुवर्ण परिमाण
४००. सोने-चांदी बाजार
४०१. हुंडणावळ
४०२. हुंडणावळीचा दर
४०३. हुंडी
४०४. हुंडी बाजार

५. आर्थिक संघटना

४०५. आंतरराष्ट्रीय कामगार संघटना
४०६. आंतरराष्ट्रीय नाणेनिधी
४०७. आंतरराष्ट्रीय पुनर्रचना आणि विकास बँक
४०८. आंतरराष्ट्रीय विकाससंख्या
४०९. आंतरराष्ट्रीय वित्तमहामंडळ
४१०. आर्थिक नियोजन मंडळ
४११. आशियाई विकास बँक
४१२. ऑल इंडिया ट्रेड युनियन काँग्रेस
४१३. इंडियन असोशिएशन
४१४. इंडियन नॅशनल ट्रेड युनियन काँग्रेस
४१५. ईस्ट इंडिया असोसिएशन
४१६. इंडियन चेंबर ऑफ कॉमर्स
४१७. उत्पादक संघ
४१८. उद्योगधंदे
४१९. उद्योगधंदे, अवजड
४२०. उद्योगधंदे, केंद्रीकरण
४२१. उद्योगधंदे, मूलभूत
४२२. उद्योगधंदे, लघु

४८५. वायदेबाजार
४८६. वाहतूक महामंडळ
४८७. विकसित अर्थपद्धती
४८८. विकासोन्मुख अर्थपद्धती
४८९. विक्रेता संघ
४९०. वितरण व्यवस्था
४९१. विविध कार्यकारी सहकारी संस्था
४९२. वीज महामंडळ
४९३. शासकीय हिशेब समिती
४९४. शिधा वाटप यंत्रणा
४९५. सहकारी अर्थव्यवस्था
४९६. सहकारी उद्योगधंदे
४९७. सहकारी उद्योगधंदे, भारत
४९८. सहकारी उद्योगधंदे, महाराष्ट्र
४९९. सहकारी उद्योग संघ
५००. सहकारी बँक
५०१. सहकारी शेती
५०२. सहकारी संस्था
५०३. सहकारी संस्था, भारत
५०४. सहकारी संस्था, महाराष्ट्र
५०५. संयुक्त भांडवल मंडळे
५०६. संयुक्त राष्ट्र व्यापार आणि विकास परिषद
५०७. सार्वजनिक लेखा समिती
५०८. सार्वजनिक मर्यादित कंपनी
५०९. सार्वजनिक न्यास
५१०. स्टेट ट्रेडिंग कार्पोरेशन
५११. सौदापद्धती, सामुदायिक
५१२. हस्तव्यवसाय संघ

६. आर्थिक विकास

५१३. आर्थिक क्रांती
५१४. आर्थिक नियोजन
५१५. आर्थिक नियोजन : कार्यात्मक
५१६. आर्थिक नियोजन : प्रादेशिक
५१७. आर्थिक नियोजन : वास्तव
५१८. आर्थिक नियोजन : वित्तिय
५१९. आर्थिक नियोजन : रचनात्मक
५२०. आर्थिक विकास : अमेरिका
५२१. आर्थिक विकास : इंग्लंड
५२२. आर्थिक विकास : जपान
५२३. आर्थिक विकास : चीन
५२४. आर्थिक विकास : जर्मनी
५२५. आर्थिक विकास : भारत
५२६. आर्थिक विकास : निसर्गवादी संप्रदाय
५२७. आर्थिक विचार : पुरायणवादी
५२८. आर्थिक विचार : साम्यवादी
५२९. आर्थिक विचार : लोकशाही
५३०. आर्थिक विचार : खुल्या व्यापाराचे पुरस्कर्ते
५३१. आर्थिक विचार : सहकाराचे पुरस्कर्ते
५३२. आर्थिक विचाराचा इतिहास : भारत
५३३. आर्थिक विचाराचा इतिहास : अमेरिका
५३४. आर्थिक विचाराचा इतिहास : इंग्लंड
५३५. आर्थिक विचाराचा इतिहास : युरोप
५३६. आर्थिक संशोधन
५३७. आर्थिक विषमता
५३८. उद्योगधंदे : भारत
५३९. उद्योगधंदे : महाराष्ट्र

५४०. औद्योगिक क्रांती
५४१. औद्योगिक शिक्षण
५४२. औद्योगिक संशोधन
५४३. औद्योगिक संबंध
५४४. कामगार
५४५. कामगारविषयक कायदे : अमेरिका
५४६. कामगारविषयक कायदे : इंग्लंड
५४७. कामगारविषयक कायदे : भारत
५४७. कामगारविषयक कायदे : महाराष्ट्र
५४९. टाळेबंदी
५५०. पंचवार्षिक योजना : भारत
५५१. निर्वाह अर्थव्यवस्था

७. चरित्रपर लेख

५५२. ॲडॅम स्मिथ
५५३. ओवेन, रॉबर्ट
५५४. कने, फ्रॅंकाईल
५५५. काळे, वा. गो.
५५६. किर्लोस्कर, लक्ष्मण काशिनाथ
५५७. कीन्स, जे. एम्.
५५८. गाडगीळ, धनंजयराव
५५९. जोशी, ना. म. (कामगार नेते)
५६०. टाटा, जमशेटजी
५६१. दत्त, रमेशचंद्र
५६२. नॉर्थ, सर डड्ले
५६३. बेकन, फ्रान्सीस
५६४. बेंथाम, जेरेमी
५६५. फिशर, इर्विंग
५६६. मार्शल, अल्फेड
५६७. माल्थस, थॉमस रॉबर्ट
५६८. मिल, ऑन स्टुअर्ट
५६९. मॅक्स वेबर
५७०. रॉबिन्स
५७१. रिकार्डो, डेव्हीड
५७२. लोखंडे, ना. म.
५७३. लिस्ट, फ्रेडरिक
५७४. सेंट सायमन
५७५. झे, जीन बॅप्टीस्ट
५७६. लिओनार्ड द सिस्मंडी

८. भारताच्या विविध राज्यांचे अर्थ जीवन

५७७. आर्थिक स्थिती : आसाम
५७८. आर्थिक स्थिती : आंध्र
५७९. आर्थिक स्थिती : उत्तरप्रदेश
५८०. आर्थिक स्थिती कर्नाटक
५८१. आर्थिक स्थिती : काश्मीर
५८२. आर्थिक स्थिती : केरळ
५८३. आर्थिक स्थिती : ओरिसा
५८४. आर्थिक स्थिती : गोवा
५८५. आर्थिक स्थिती : गुजरात
५८६. आर्थिक स्थिती : तामीळनाडू
५८७. आर्थिक स्थिती : नाग प्रदेश
५८८. आर्थिक स्थिती : पंजाब
५८९. आर्थिक स्थिती : बंगाल
५९०. आर्थिक स्थिती : बिहार
५९१. आर्थिक स्थिती : मध्यप्रदेश
५९२. आर्थिक स्थिती : महाराष्ट्र
५९३. आर्थिक स्थिती : राजस्थान
५९४. आर्थिक स्थिती : सिक्कीम
५९५. आर्थिक स्थिती : हरियाना

५९६. आर्थिक स्थिती : इतर राज्ये

९. ग्रंथ परिचय

५९७. वेल्थ ऑफ नेशन्स : अॅडम स्मिथ
५९८. एसे ऑन पॉप्युलेशन : माल्थस
५९९. ए न्यू व्ह्यू ऑफ सोसायटी : रॉबर्ट ओवेन
६००. प्रिन्सिपल्स ऑफ पोलिटिकल एकॉनॉमी अँड टॅक्सेशन : डेव्हीड रिकॉर्डो
६०१. प्रिन्सिपल्स ऑफ पोलिटिकल एकॉनामी : जॉन स्टुअर्ट मिल
६०२. नॅशनल सिस्टिम ऑफ पोलिटिकल एकॉनामी : फ्रेडरिक लिस्ट
६०३. कॅपिटल : कार्ल मार्क्स
६०४. प्रिन्सिपल्स ऑफ इकॉनामिक्स : मार्शल
६०५. कॉमनसेन्स ऑफ पोलिटिकल एकॉनॉमी : विकस्टीड
६०६. दि नेचर अँड सिग्निफिकन्स ऑफ एकॉनॉमिक सायन्स : राबिन्स
६०७. जनरल थिअरी ऑफ इन्टरस्ट, एम्प्लायमेंट अँड मनी : कीन्स
६०८. पॉव्हर्टी अँड अन ब्रिटिश रूल इन इंडिया : दादाभाई नौरोजी
६०९. दि एकॉनॉमिक हिस्टरी ऑफ इंडिया : आर. सी. दत्त
६१०. एसेज ऑन इंडियन एकनॉमिक्स म. गो. रानडे
६११. डेव्हलपमेंट ऑफ एकॉनॉमिक आयडियाज इन इंडिया पी. के. गोपालकृष्णन

१०. संकीर्ण

६१२. अल्पबचत
६१३. अंदाजपत्रक
६१४. काटकसर
६१५. जननप्रमाण
६१६. देणी व घेणी
६१७. नावलौकीक (धंद्याचा)
६१८. फॅमिन कमिशन
६१९. बचत, खर्चाची
६२०. मार्शल एड
६२१. मूळ वर्ष
६२२. राष्ट्रीय बचत
६२३. राष्ट्रीय संपत्ती
६२४. राहणीमान
६२५. राहणीमान, निर्देशांक
६२६. रोखा
६२७. लोकसंख्या
६२८. लोकसंख्या, उचित
६२९. लोकसंख्या, जग
६३०. लोकसंख्या, भारत
६३१. लोकसंख्या, महाराष्ट्र
२३२. व्यापारी नौदल
६३३. विश्वस्त मंडळ
६३४. सट्टा
६३५. सांघिक सौदा

भारतीय समाजविज्ञान कोश

सल्लागार समिती

श्री. जे. पी. नाईक, मेंबर सेक्रेटरी,
इंडियन कौन्सिल ऑफ सोशल सायन्स रिसर्च,
नवी दिल्ली

श्री. ना. ग. गोरे
सामाजिक कार्यकर्ते, पुणे
सदस्य, राज्यसभा

बॅ. विठ्ठलराव गाडगीळ
सामाजिक कार्यकर्ते, पुणे
संरक्षण उत्पादन मंत्री, नवी दिल्ली

डॉ. एम. एस. गोरे, डायरेक्टर,
टाटा इन्स्टिटयूट ऑफ सोशल सायन्सेस
मुंबई

श्री. जयंतराव टिळक
संपादक, 'केसरी' पुणे
सदस्य, राज्यसभा

समाजविज्ञान मंडळाचे सभासद

प्राचार्य या. शि. महाजन, अध्यक्ष
सदस्य, लोकसभा

प्रा. भगवंत देशमुख
शासकीय महाविद्यालय, औरंगाबाद

डॉ. ना. र. इनामदार
राज्यशास्त्राचे प्राध्यापक, पुणे विद्यापीठ

प्रा. ग. प्र. प्रधान
सदस्य, महाराष्ट्र विधान परिषद

डॉ. व्ही. व्ही. बोरकर
अर्थशास्त्र विभाग प्रमुख, मराठवाडा विद्यापीठ

प्राचार्य शिवाजीराव भोसले
मुधोजी महाविद्यालय, फलटण

डॉ. विलास संगवे
समाजशास्त्र विभाग प्रमुख, शिवाजी विद्यापीठ

डॉ. अ. रा. कुलकर्णी
इतिहास विभाग प्रमुख, पुणे विद्यापीठ

श्री. गो. य. राणे
प्रकाशक, पुणे

डॉ. एन. आर. देशपांडे
राज्यशास्त्र विभाग प्रमुख, नागपूर विद्यापीठ

श्री. प्र. रा. देशमुख
ॲडव्होकेट, औरंगाबाद

श्री. स. मा. गर्गे, संचालक

प्रकाशक
स. मा. गर्गे
'ज्ञानेश' १२०५/४ शिवाजीनगर,
पुणे ४

मुद्रक
चिं. स. लाटकर
कल्पना मुद्रणालय,
'शिव-पार्वती'
४६१/४ सदाशिव पेठ,
पुणे ३०